## निविदा सूचना

### वाहन भाडयाने घेणेबाबत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्हा कार्यालय, गोंदियाकरीता ०१ वाहन एक वर्ष कालावधीकरीता वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. वाहनाचा प्रकार- टाटा गोल्ड, टाटा सुमो, टाटा सुमो व्हिक्टा सन २०१३ नंतरच्या नोंदणीच्या वर्षाच्या आधारे वाहनाला प्राधान्य देण्यात येईल. शासकीय कामाकरीता वाहन पुरविणारे कंत्राटदाराकडून भाडयाने घ्यावयाचे आहे. करीता मोहोरबंद पॉकीट मध्ये निविदा मागविण्यात येत असून, वाहने भाडयापोटी प्रति दिन दर, प्रती कि.मी. दर वाहन चालक व इंधनासह किंवा ३००० किमी चा ठराविक मासिक दौरा प्रमाणे तसेच तदनंतरचे भाडे प्रती कि.मी. नमूद करावा. मंजूर निविदाचे निर्धारित केलेल्या वाहनाचे देखभाल व दुरुस्ती अंतर्गत येणारा खर्च (जसे, वाहन दुरुस्ती, विमा, सुटे भाग व कर इत्यादिवर होणारा खर्च) हा मिळणाऱ्या भाडयात अंतर्भूत राहील. या अटी व शर्ती मान्य असल्यास निविदेमध्ये प्रतीदिन/प्रती किमी भाडे नमूद करावे.

निविदेसोबत रू. १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार फक्त) बँक ड्राफ्ट उपजिल्हाधिकारी (रोहयो) गोंदिया यांचे नांवाने राष्ट्रीयकृत बँकेच्या धनाकर्ष जोडणे आवश्यक राहील. त्याशिवाय निविदा अधिकृत समजल्या जाणार नाही. निविदाचे विहित प्रपत्र अटी व शर्तीसह www.gondia.gov.in या संकेतस्थळावर निविदा भरावयाचा अर्ज व दराबाबतचा तपशिलाचा नमुना उपलब्ध आहे. तसेच काही कारणास्तव सदर निविदा रद्द करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक (मग्रारोहयो) जिल्हा गोंदिया यांना राहील.

### निविदा तपशील.

| अ.क्र. | तपशील | तारीख |
|---|---|---|
| १ | निविदा फार्म विक्री तारीख | ५/९/२०१५ ते २१/९/२०१५ |
| २ | निविदा सादर करण्याची अंतिम तारीख | २१/९/२०१५ दुपारी ४.०० |
| ३ | निविदा उघडण्याची तारीख | २२/९/२०१५ दुपारी १२.०० वा. |

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, गोंदिया.

## निविदा सूचना

### वाहन भाडयाने घेणेबाबत.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत जिल्हा कार्यालय, गोंदियाकरीता ०१ वाहन भाडे तत्वावर घ्यावयाचे आहे. वृत्तपत्रात जाहिरात प्रकाशित करुन जाहिरातीद्वारे निविदा मागविण्यात येत आहे. वाहनाचा प्रकार- टाटा गोल्ड, टाटा सुमो, टाटा सुमो व्हिक्टा सन २०१३ व त्यानंतरच्या नोंदणीच्या वर्षाच्या आधारे वाहनाला प्राधान्य देण्यात येईल. शासकीय कामाकरीता वाहन पुरविणारे कंत्राटदाराकडून एक वर्ष कालावधीकरीता भाडयाने घ्यावयाचे आहे. निविदा सादर करण्याची अंतिम दि. २१/९/२०१५ ही आहे. करीता मोहोरबंद पॉकीट मध्ये निविदा मागविण्यात येत असून, सदर निविदाबाबतच्या अटी व शर्ती तसेच सविस्तर माहिती **www.gondia.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, गोंदिया.

निविदेच्या अटी व शर्ती

१) वाहन भाडयावर प्रती दिन/कि.मी. वाहन चालक व इंधनासह दर निविदेमध्ये नमूद करावा.

२) सदर भाडयाचे रक्कमेत वाहन दुरूस्ती, सर्व सुटे भाग, विमा खर्च, कर इत्यादि सर्व बाबींचा खर्च भाडयाच्या दरामध्ये अंतर्भूत राहील. वाहन टाटा गोल्ड, टाटा सुमो, टाटा सुमो व्हिक्टा ही एसी सुविधासह सन २०१३ व त्यानंतरचे असावे.

३) संबंधित वाहनाचा खरेदीचा कालावधी चार वर्षापेक्षा जास्त असू नये. तसेच वाहन अद्यावत सुस्थितीत असणे आवश्यक आहे.

४) निविदेसोबत संबंधित वाहन एजन्सीचे कंपनीचे भाडयाने घ्यावयाचे वाहनाचे कागदपत्रे आवश्यक आहे. कागदपत्रामध्ये वाहनमालकीचे असल्याचे खरेदी पत्र रजिस्ट्री, टॅक्स भरल्याची पावती जोडण्यात यावी.

५) निवेदेसह जोडण्यात येणारी कागदपत्रे (झेरॉक्स) सक्षम प्राधिकाऱ्यांकडून साक्षांकित केलेल्या असाव्यात.

६) सदर वाहन २०१५-१६ या वित्तीय वर्षात व नंतरच्या कालावधीकरीता भाडयाने घ्यावयाचे आहे. निविदेसोबत अनामत रक्कम रू. १०,०००/- चा राष्ट्रीयकृत बँकेचा डिमांड ड्रॉफट उपजिल्हाधिकारी (रोहयो), गोंदिया यांचे नांवाने जोडण्यात यावा.

७) सदर वाहन भाडयाने घेतल्यावर दौरा कालावधीत कोणत्याही अघटीत घटना/दुर्घटना व वाहन दुरूस्त झाल्यास त्याबाबत कार्यालयाची जबाबदार राहणार नाही. वाहनाचा वापर ग्रामिण भाग, डोंगराळ, अतिदुर्गम भागात केला जाईल व वाहन २४ तास उपलब्ध असावे. वाहन सदैव सुस्थितीत असावे.

८) वाहन भाडयाने घेतल्यावर या वाहनाचे दुर्घटना पॉलिसी/थर्ड पार्टी इन्सुरंस सह विमा पॉलीसी काढण्यात आलेली असावी. या विमा पॉलीसी मध्ये गाडीमध्ये बसलेला अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सर्वकष विमा असावा व या बाबतचे वैध असलेले कागदपत्रे निवेदेसह जोडावे.

९) सदर भाडयाने घेतलेल्या वाहनाची आवश्यकता नसल्यास कोणत्याही वेळी करार रदद करून वाहन परत करण्यात येईल.

१०) निविदेप्रमाणे नमूद वाहन कार्यालयीन कामाकरीता लागत असल्यामुळे योजनेच्या प्रसिध्दी करीता कोणताही बॅनर गाडीवर लावण्यात येईल. याबाबत नाहरकत प्रमाणपत्र निवेदेसोबत जोडण्यात यावे.

११) वरील अटी व शर्तीपैकी कोणत्याही अट शिथिल करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

१२) वाहनाचे दुरूस्तीची जबाबदारी वाहनमालकाची राहील. किरकोळ दुरूस्ती एक दिवसात तर मोठी दुरूस्ती २ दिवसात करण्यात यावी.

१३) वाहन केवळ मालकाच्या अकार्यक्षमतेमुळे बंद राहील्यास व त्यामुळे शासकीय कामावर अनिष्ट परिणाम झाल्यास निर्धारित कंत्राट ठरल्यावर ते प्रती दिवस दर येईल त्याप्रमाणे तेवढया दिवसाचे देयकातून कापून घेण्यात येईल. वाहनाचा रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर करारनामा करून घ्यावा लागेल त्यानंतरच वाहन कामावर लावण्यात येईल.

१४) या कार्यालयाकरीता शासनामार्फत शासकीय वाहन उपलब्ध झाल्यास सदर करारनामा त्यावेळेस रदद करण्यात येईल. तसेच वाहनाच्या सुविधा असमाधानकारक वाटल्यास सदर करारनामा रदद करण्यात येईल.

जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, गोंदिया.

## निविदा अर्ज

विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१५-२०१६ व त्यानंतरच्या कालावधीकरीता वाहन भाडयाने घेण्याबाबत.

-------oo--------

१) अर्जदाराचे नांव :-

२) अर्जदाराचा पत्रव्यवहारासाठी संपूर्ण पत्ता व दूरध्वनी क्रमांकासह :-

४) अनामत रक्कम (इ.एम.डी.) डिमांड ड्राफ्ट क्रमांक व दिनांक :-

५) वाहन भाडयाने देण्याबाबत निविदा दराचा वेगळा लिफाफा-ब जोडला आहे. :-

६) निविदेच्या अटी व शर्ती मान्य आहेत काय? :-

ठिकाण :-

दिनांक :- निविदा धारकाची स्वाक्षरी व नांव

प्रति,
मा. जिल्हाधिकारी तथा
जिल्हा कार्यक्रम समन्वयक
मग्रारोहयो, गोंदिया.

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजना
जिल्हा गोंदिया.

परिशिष्ट-ब

विषय :- महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामिण रोजगार हमी योजने अंतर्गत सन २०१५-१६ व त्यानंतरच्या कालावधीकरीता १ वर्ष कालावधीकरीता वाहन भाडयाने घेण्याबाबत.

| अ. क्र. | वाहनाचे नांव | वाहनाचे भाडे | वाहन भाडयाची एकूण रक्कम (रुपये) |
|---|---|---|---|
| | | मासिक भाडे ३००० कि.मी. पर्यंत [इंधन व चालकासह] | |
| १ | | | |
| २ | | | |
| ३ | | | |

प्रती माह ३००० कि.मी. च्या वर प्रती कि.मी. भाडे रू.

(अक्षरी-----------------------------------------------------------------)

जाहीर निविदेतील अटी व शर्ती मी वाचल्या असून त्या मला मान्य असून बंधनकारक आहेत. करीता खाली स्वाक्षरी करीत आहे.

स्वाक्षरी/- --------------------

नांव -------------------------